नि.फौ.ख.क्रं. २५५/२०२१

सरकार –वि– ज्ञानेश्वर मुंडे

नि.क्र. ११

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव – सिध्दार्थ श्रीराम पहुरकर,

वय. ४२ वर्षे, व्यवसाय – शेती,

राहणार – तिव्हान बु., ता. शेगाव, जिल्हा – बुलडाणा.

**सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.**

१. दि. १०.०६.२०२१ रोजी ग्राम तिव्हान येथे विष्णु भगवान पहुरकर यांच्या शेतात माझ्या समक्ष घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा झाला होता. पोलीसांनी माझ्या समक्ष ज्ञानेश्वर मुंडे याला दारु काढत असल्यामुळे त्याच्यावर धाड टाकली होती. पोलीसांनी माझ्या समक्ष डब्बे फोडले होते. त्या डब्ब्यामध्ये काय होते हे मला सांगता येणार नाही. आता मला घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी पंच क्र. २ म्हणुन माझी सही आहे. त्यामधील मजकुर मला वाचून दाखविला असता तो बरोबर आहे. घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्याला **नि.क्र. १२** देण्यात येते. आरोपीला मी ओळखतो. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास संपला.**

**उलटतपास आरोपीतर्फे श्री. बी. यु. ब्राम्हणे, वकील यांचे मार्फत.**

२. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकूर मी खोटा सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझे आरोपीसोबत पटत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीसोबत माझे पूर्वीपासून वैमनश्य आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी गावचा पोलीस पाटील आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे माझे पोलीसांशी चांगले संबंध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलीस पाटील असल्यामुळे पोलीसांच्या शब्दाबाहेर जात नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर वाचून बघितला नव्हता व पोलीसांनी सांगितल्याप्रमाणे मी सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**यावेळेस सरकारी वकीलांनी फेरतपास करण्याची पनवानगी मागितली असता सरकारी वकीलांना फेरतपासणी करण्याची परवानगी दिली.**

३. मी पंचनाम्यावर त्यातील मजकूर वाचून न बघता सही केली होती. पंचनाम्यातील मजकूर मला वाचून सुध्दा दाखविला नव्हता. मी कोणत्याही कागदपत्रावर पोलीस पाटील या नात्याने त्यातील मजकूर न वाचता सही करत नाही. पोलीसांनी आरोपीवर माझ्या

समक्ष छापा टाकल्यामुळे मी पंचनाम्यातील मजकूर न वाचताच त्यावर सही केली होती.

**<u>फेरतपास संपला.</u>**

**<u>उलटतपास आरोपीचे विधीज्ञ श्री. बी. यु. ब्राम्हणे यांचे मार्फत</u>**

४. हे म्हणणे खरे नाही की, फेरतपासात सांगितलेला संपूर्ण मजकूर मी खोटा सांगितला आहे.

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (एन. डी. मेश्राम ) | (एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि. १३.१०.२०२५ | दि. १३.१०.२०२५ |